# संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807
ई-मेल-principal.mfrc933@gmail.com
फोन नं.07220-230230


जा.क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 173 /2026-27 चिखलदरा 444 807, दिनांक:- 16/09/2026

प्रति,

मा. उप वनसंरक्षक,
( शिक्षण व प्रशिक्षण )
म.रा.पुणे.

**विषय:**- माहे ऑगस्ट 2026 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.

**संदर्भ:**- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक **64** मधील प्रशिक्षणार्थींचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक **01/08/2026** ते **31/08/2026** पर्यंतचा मासिक शैक्षणिक अहवाल सोबत सहपत्रित करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र:**- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 01 ते 22 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नवनियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 25/05/2026 पासुन संस्थेमध्ये नवनियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 64 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे.

**दिनांक** 01/08/2026 **ते** 31/08/2026 या कालावधीत, संस्थेच्या **संचालक, कु**. **मुक्ताबाई वि**. **टेकाळे,** यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक **01/08/2026 ते 31/08/2026** या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा द्वितीय सत्र अभ्यासक्रम.<br>(माहे ऑगस्ट 2026) | 03 ते 05 |
| 02 | अण्णाभाऊ साठे यांची जयंती. (दि. 01/08/2026) | 06 |
| 03 | क्रांतीसींह नाना पाटील यांची जयंती. (दि. 03/08/2026) | 07 |
| 04 | जागतीक आदिवासी दिवस. ( दि. 09/08/2026 ) | 08 |
| 05 | देशाचा 80 वा स्वातंत्र्यदिन. ( दि. 15/08/2026 ) | 09 |
| 06 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 प्रथम विदर्भ अभ्यास दौरा.<br>( दि. 17/08/2026 ते 25/08/2026 ) | 10 ते 20 |
| 07 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांची विदर्भ अभ्यास दौरा परीक्षा.<br>( दि. 31/08/2026 ) | 21 |
| 08 | संस्थेच्या परीसरामध्ये क्षत्रीय कामे ( माहे ऑगस्ट 2026 ) | 22 |

# 01. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 द्वितीय सत्र अभ्यासक्रम. ( माहे ऑगस्ट 2026 )

**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 द्वितीय सत्र अभ्यासक्रम. ( माहे ऑगस्ट 2026 )**

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि.** 25/05/2026 पासुन नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी **सत्र क्र.** 64 यांच्या **सहा महिने** कालावधी प्रशिक्षणातील प्रथम सत्र पुर्ण झाले असुन द्वितीय सत्राला सुरुवात झाली व सदर प्रशिक्षणार्थींचा **द्वितीय सत्र** अभ्यासक्रम खाली दिलेल्या तक्ता प्रमाणे सुरु करण्यात आले.

| **अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 64 ( कालावधी दि. 25/05/2026 ते 20/11/2026 )** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ (**Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **वनसंरक्षण** | श्री. एस. एन. गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** वन संपदेचे तोड, अतिक्रमण, तस्करी व वनआग यापासून संरक्षण करणे. जैवविविधतेचे संवर्धन करणे. वनरक्षकांची जबाबदारी, अधिकार व कर्तव्यांची जाणीव करुन देणे.<br>**मुख्य घटक:** वनआग प्रतिबंध व नियंत्रण. अवैध वृक्षतोड व वाहतूक रोखणे. अतिक्रमण प्रतिबंध. वन्यजीव संरक्षण. वन कायदे व नियम ( वन अधिनियम, वन्यजीव संरक्षण अधिनियम ) गस्त व संरक्षणात्मक उपाय. |
| | | | |
| 03 | **वनव्यवस्थापन** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश :** वनसंपत्तीचा नियोजित व शाश्वत वापर करणे. वनांचे उत्पादन व संरक्षण यामध्ये समतोल साधणे. दीर्घकालीन वन व्यवस्थापन नियोजन समजून घेणे.<br>**मुख्य घटक:** कार्ययोजना (Working Plan) वन क्षेत्रांचे वर्गीकरण. तोड व पुनरुत्पादन पध्दती. वन नोंदी व अभिलेख. निरीक्षण व मूल्यांकन. वनरक्षकांची भूमिका. |
| 04 | **वनउपयोगिकरन** | श्री. आर. बी. गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी, ( से. नि. ) | **उद्देश : वन उपयोगिता (**Forest Utilization) वनसंपत्तीचा शाश्वत उपयोग कसा करावा हे शिकवण्यात आले.<br>**मुख्य घटक:** इंधन, औषधी वनस्पती, बांबू, गवत यांचा उपयोग स्थानिक समुदायाचा सहभाग बाजारपेठेतील मागणी व पूर्ती व्यवस्थापन. |
| | | | |
| 05 | **संगणक** | श्री. आनंद पिडीआर, तालुका व्यवस्थापक, आपले सेवा केंद्र, पंचायत समिती चिखलदरा. | **संगणक (**Computer)<br>प्रशिक्षणार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान देण्यात आले.<br>**अभ्यासाचे मुद्दे:** MS Office (Word, Excel, Power Point) ई-मेल व इंटरनेट वापर , वनविभाग संबंधित सॉफ्टवेअरचा उपयोग<br>**उद्देश:** कार्यालयीन कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर. |
| 06 | **व्यवस्थापकीय कौशल्य** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : वनक्षेत्रातील कामकाज प्रभावी, समन्वित व नियोजित रीतीने पार पाडणे. कार्यसंघ अधिक सक्षम व परिणामकारक बनवणे.<br>**मुख्य घटक:** नियोजन, संघटन, मार्गदर्शन व नियंत्रण नेतृत्व, निर्णयक्षमता व समस्या निराकरण मनुष्यबळ व्यवस्थापन व संवादकौशल्य. |

वनरक्षक सत्र क्र. 64 द्वितीय सत्र अभ्यासक्रम.








# वनरक्षक सत्र क्र. 64 द्वितीय सत्र अभ्यासक्रम.







## 02. **अण्णाभाऊ साठे यांची जयंती**. ( **दि**. 01/08/2026 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 01/08/2026 रोजी **अण्णाभाऊ साठे** यांची जयंती **वनपरिक्षेत्र अधिकारी**, आर. जी. मून, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

अण्णाभाऊ साठे हे एक थोर साहित्यिक, लोककवी आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म 1 ऑगस्ट 1920 रोजी वटेगाव, सांगली जिल्ह्यात झाला. त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि श्रमिक वर्गाचे दु:ख मांडले. त्यांच्या लेखनात तमाशा, पोवाडे, लोककथा यांचा प्रभावी वापर दिसून येतो. **" फकीरा "** ही त्यांची सर्वात प्रसिध्द कादंबरी असून, ती शोषितांच्या लढ्याचे प्रतीक ठरली आहे.

**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, यांची जयंती** वन प्रशिक्षण संस्थेत साजरी करुन त्यांचे कार्य व विचार यांना उचित अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे उपस्थित अधिकारी, कर्मचारींमध्ये सामाजिक समतेबद्दल जागरुकता निर्माण झाली.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी जीवनातून सामाजिक समतेचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवण्यात आला. त्यांच्या कार्याचा सन्मान राखत जयंती उत्सव अत्यंत सन्मानपूर्वक व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. अशा कार्यक्रमांतून संस्था सामाजिक बांधिलकी जपत आहे.

## 03. **क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती**. ( **दि**. 03/08/2026 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 03/08/2026 रोजी **क्रांतीसिंह नाना पाटील** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानास अभिवादन करण्यात आले. त्यांच्या देशभक्ती, त्याग, धैर्य व सामाजिक बांधिलकीच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांचा आदर्श घेऊन कर्तव्यनिष्ठा, राष्ट्रसेवा व सामाजिक उत्तरदायित्वाची भावना वृध्दिंगत करण्याचा संदेश देण्यात आला. सदर जयंतीनिमित्त त्यांच्या महान कार्यास आदरांजली अर्पण करण्यात आली.

## 04. **जागतिक आदिवासी दिवस**. ( दि. 09/08/2026 )





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 09/08/2026 रोजी नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांनी **जागतिक आदिवासी दिवस** साजरा केला व तसेच संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडले.

सदर दिनानिमित्त आदिवासी समाजाची समृध्द सांस्कृतिक परंपरा, रुढी, चालीरीती, कला व निसर्गाशी असलेले अतूट नाते यांचे स्मरण करण्यात आले. आदिवासी समाजाचे वनसंवर्धन व पर्यावरण संरक्षणातील महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित करण्यात आले. तसेच आदिवासी बांधवांच्या हक्कांचे, परंपरांचे व सामाजिक योगदानाचे जतन करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. सदर उपक्रमामुळे प्रशिक्षणार्थींमध्ये आदिवासी संस्कृतीविषयी आदर, सामाजिक समता, बंधुभाव आणि पर्यावरण संवर्धनाची भावना वृध्दिंगत झाली. एकूणच, जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी समाजाच्या योगदानास अभिवादन करून सामाजिक ऐक्य व निसर्गसंवर्धनाचा संदेश देण्यात आला.

## 05. **देशाचा 80 वा स्वातंत्र्यदिन**. ( **दि**. 15/08/2026 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **15 ऑगस्ट** 2026 रोजी देशाचा 80 **वा स्वातंत्र्यदिन** अत्यंत उत्साहात आणि सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमात कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी तसेच सत्र क्र. 64 चे सर्व प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व देशभक्तिवर गीते सादर करण्यात आली. यानंतर संचालक, यांनी उपस्थितांना संबोधित करत स्वातंत्र्य दिनाचे महत्व, आपल्या जबाबदाऱ्या आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्व अधोरेखित केले.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला आणि शेवटी सर्वांनी एकत्र येऊन सामूहिक छायाचित्र काढले. 80 वा स्वातंत्र्यदिन वन प्रशिक्षण संस्थेत अत्यंत शिस्तबध्द आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमामुळे देशभक्तीची भावना वृध्दिंगत झाली असून, सर्वांनी राष्ट्रप्रेम, कर्तव्यपरायणता आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने कार्य करण्याचा संकल्प केला. संचालक यांचे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरले. एकूणच हा कार्यक्रम संघटनात्मक एकता आणि राष्ट्रीय भावना दृढ करणारा ठरला.

## 06. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 चा विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा कार्यक्रम. ( दि. 17/08/2026 ते 25/08/2026 )

## ( ज्ञानगंगा अभयारण्य )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 64 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांचा दिनांक 17/08/2026 **ते** 25/08/2026 या कालावधी मध्ये **विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा** आयोजित करण्यात आला होता. सदर कालावधी मध्ये सर्व प्रशिक्षणार्थी यांनी दौऱ्या दरम्यान खालील प्रमाणे विविध ठिकाणांवर भेट दिली.

| अ.क्र. | दिनांक व वार | भेटीचे ठिकाण | भेटीचे कारण |
|---|---|---|---|
| 01 | 17/08/2026 सोमवार | **ज्ञानगंगा अभयारण्य खामगाव** | ज्ञानगंगा अभयारण्यात भेट देऊन वन जमिनीवरील चराई नियंत्रणासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे व चराई युनिट्स ची माहिती, खामगाव परिसरातील सामाजिक वनिकरणाच्या रोडसाईड रोपवण गट लागवड कामाला भेट. |
| 02 | 18/08/2026 मंगळवार | **शेगाव ते लोणार सरोवर** | लोणार सरोवर येथील सरोवर परिसरातील वनसंवर्धन व जैव विविधता अभ्यास करणे. |
| 03 | 19/08/2026 बुधवार | **यवतमाळ ते पांढरकवडा टिपेश्वर अभयारण्य** | यवतमाळ वनपरीक्षेत्रातील उमरडा येथील नैसर्गिक चंदन वृक्षाच्या भागास भेट व नर्सरी कामे तसेच जल संधारण वन्यजीव संवर्धन व वनक्षेत्र सुरक्षा कामांचा अभ्यास करुन टिपेश्वर अभयारण्यास भेट व सफारी करुन आंतरराज्यीय पिंपळखुटी नाका, पिंपळखुटी भेट. |
| 04 | 20/08/2026 गुरुवार | **वन अकादमी चंद्रपूर/ विसापुर बॉटनीकल गार्डन** | वनस्पतींच्या प्रजातींच्या विविधता, त्यांची पर्यावरणीय भूमिका आणि वनस्पति संवर्धनाचे महत्व जाणून घेण्यासाठी विसापूर येथील बॉटनीकल गार्डनला भेट. संचालक, वन अकादमी चंद्रपूर यांचेशी भेट. |
| 05 | 21/08/2026 शुक्रवार | **ताडोबा** | 1. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प भेट. इको टुरिझम व पर्यटणामध्ये स्थानिकांचा सहभाग, मानव वन्यजीव संघर्ष व अवैध शिकार या मधील आव्हानांबद्दल अभ्यास व समस्या प्रभावीपणे मधील हाताळण्याबाबत माहिती घेणे. 2. वन्यजीव संवर्धन आणि व्यवस्थापन बाबत अभ्यास. 3. वाघांचा मागोवा आणि निरीक्षण करुन नोंद घेण्यामध्ये वनरक्षकांची भूमिका. |
| 06 | 22/08/2026 शनिवार | **नवेगाव बांध** | 1. प्रवासादरम्यान ब्रम्हपुरी आणि वडसा येथील वृक्षारोपन आणि रोपवाटिकेला भेट.<br>2. नवेगावबांध येथील पर्यटन संकुलास भेट आणि पर्यटन अभ्यास. |
| 07 | 23/08/2026 रविवार | **राष्ट्रीय उद्यान व पुनर्वसन गावास भेट** | 1. नवेगाव राष्ट्रीय उद्यानाला भेट आणि जलीय परिसंस्थेचे व्यवस्थापन कसे केले जाते याचा अभ्यास करणे. 2. राष्ट्रीय उद्यानातील गावांचा स्वेच्छिक पुनरवसनाच्या प्रक्रियेचा आणि परिणामांचा अभ्यास करणे. 3. शिकार विरोधी शिबिर आणि एम |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | स्ट्रिप पेट्रोलिंगच्या कार्याचा अभ्यास करणे. |
| 08 | 24/08/2026<br>सोमवार | **नागपूर सालेकसा चुलबंद** | 1. वन विकास महामंडळाच्या चुलबंद नर्सरीला भेट देणे. 2. सालेकसा येथील स्थानिक नागरिकांनी केलेल्या पर्यावरणीय उपक्रमांचे व हाजरा फॉल व्यवस्थापन याबाबतचा अभ्यास. |
| 09 | 25/08/2026<br>मंगळवार | **T.T.C सेंटर गोरेवाडा** | गोरेवाडा येथील Transit Treatment Center येथे भेट.<br>पुढील प्रवास वन प्रशिक्षण संस्था चिखलदरा. |

## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा
## ( लोणार सरोवर, बुलढाणा )





## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा ( टिपेश्वर अभयारण्य )









## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा
## ( रोपवाटीका उमर्डा, यवतमाळ )








# विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा ( बॉटनिकल गार्डन विसापूर )







# विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा
## ( ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर )








# विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा ( ब्रम्हपूरी आणि वडसा येथील रोपवाटीका )








# विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा
## नवेगाव राष्ट्रीय उद्यान









# विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा
## चुलबंद नर्सरी







## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा
## सालेकसा येथील हाजरा फॉल








## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा
## वन्यप्राणी उपचार केंद्र, खामगाव









## 07. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांची विदर्भ अभ्यास दौरा परीक्षा.
## ( दि. 31/08/2026 )





नव नियुक्त अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा विदर्भ अभ्यास दौरा यशस्वीपणे संपन्न झाला. या दौऱ्यामुळे प्रशिक्षणार्थींना विदर्भातील वनसंपदा, जैवविविधता व वन व्यवस्थापनाच्या प्रत्यक्ष कार्यपध्दतीची सखोल माहिती मिळाली. दौऱ्याची फलनिष्पत्ती तपासण्यासाठी प्रशिक्षणार्थींची दि. 31/08/2026 रोजी विदर्भ अभ्यास दौरा परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेतून प्रशिक्षणार्थींच्या व्यावहारिक ज्ञानात व क्षेत्रिय कामकाजात झालेली वृध्दी स्पष्ट झाली आहे. परीक्षेतील उत्तम कामगिरीवरून दौऱ्याचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे निष्पन्न होते. सदर दौरा हा प्रशिक्षणार्थींच्या पुढील सेवाकालीन वाटचालीस सक्षम बनवणारा ठरला आहे.

## 08. क्षेत्रीय कामे ( माहे ऑगस्ट 2026 )
## Type-V येथील परीसराची साफसफाई





